क्रमांक : १२४३२/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ८ सप्टेंबर, २०२०

:: **परिपत्रक** ::

या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ११८७०/क-१, दिनांक ३ सप्टेंबर, २०२० नुसार महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या कामकाजाची तातडी लक्षात घेता तसेच राज्यातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची कोरोना विषाणू संसर्ग नसल्याबाबतचा अधिवेशनाच्या अगदी लगतपूर्वीचा अधिकृत प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याने RT-PCR कोरोना चाचणी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्यानुषंगाने सर्व अधिकारी/कर्मचारी यांना शनिवार, दिनांक ५ सप्टेंबर, २०२० व रविवार, दिनांक ६ सप्टेंबर, २०२० रोजी सार्वजनिक सुट्टी दिवशी कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. तसेच या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ११८७८/क-१, दिनांक ३ सप्टेंबर, २०२० नुसार दिनांक ५ सप्टेंबर, २०२० रोजी या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना RT-PCR कोरोना चाचणी अनिवार्य करण्यात आली होती.

यानुषंगाने शनिवार, दिनांक ५ सप्टेंबर, २०२० रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरू ठेवल्यामुळे सदर दिवसाची बदली रजा शुक्रवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजी देण्यात आली आहे. तसेच रविवार, दिनांक ६ सप्टेंबर, २०२० रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी उपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सदर दिवसाची बदली रजा माहे मार्च, २०२१ पर्यंत वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीने उपभोगता येईल.

दिनांक ५ व ६ सप्टेंबर, २०२० रोजी कार्यालयात पूर्वपरवानगीने अनुपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना RT-PCR कोरोना चाचणी करुन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच उक्त दिवशी परवानगीशिवाय अनुपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. उपरोक्तप्रमाणे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय अनुपस्थित अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात हजर करुन घेतले जाणार नाही.

आदेशानुसार,
( ऋतुराज ज. कुडतरकर )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

२/-

Scanned with CamScanner

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयतील सर्व कर्मचारी

१०) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमडळ सचिवालय.

११) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता).

१२) निवडसूची.

Scanned with CamScanner